**प्रेसनोट** ला.प्र.वि., जळगाव.
दि. १७/०३/२०२६.

**इलोसे योगेश ईश्वरलाल संघवी, वय ४९ वर्षे, व्यवसाय- स्टॅम्प वेंडर, यांनी ५००/- रूपयांच्या १० स्टॅम्पचे ५,०००/- रु होत असतांना ५,५००/- रूपयांची मागणी करून अधिकचे ५००/-रूपये लाचेची मागणी करून सदरची ५००/- रूपये लाच रक्कम पंचासमक्ष त्यांचे भाऊ प्रशांत संघवी यांनी स्विकारले बाबत..**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | :- | नाशिक/जळगाव |
| **सरकारतर्फे फिर्यादी** | :- | हेमंत खंडु नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. जळगांव |
| **पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | :- | पाचोरा पोलीस ठाणे गु.र.नं /२०२६. |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | :- | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ व ७ अ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव, वय व कार्यालय** | :- | १. योगेश ईश्वरलाल संघवी, वय ४९ वर्षे, व्यवसाय- स्टॅम्प वेंडर,**(इलोसे)**<br>२. प्रशांत ईश्वरलाल संघवी, वय ५३ वर्षे, व्यवसाय-झेरॉक्स दुकान,**(खाजगी इसम)** दोन्ही रा.प्लॉट नं.४१, विवेकानंद नगर, भडगांव रोड पाचोरा, जि.जळगांव. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | :- | ५००/- रूपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :- | ५,५००/- रु. (त्यात ५००/-रु. दराच्या ११ चलनी नोटा) अ.पा.लावलेल्या त्यापैकी १० स्टॅम्पचे ५,०००/-रू. असुन उर्वरीत ५००/-रू. लाच रक्कम आहे. |
| **थोडक्यात हकिकत** | :- | यातील तक्रारदार हे दि.१५.०३.२०२६ रोजी पाचोरा शहरातील जामनेर-पाचोरा रोडवरील प्रशांत झेरॉक्स येथे ५००/-रू. दराचे १० स्टॅम्प घेण्यासाठी गेले होते. तेव्हा सदर दुकानावरील अधिकृत स्टॅम्प वेंडर योगेश संघवी यांनी त्यांना ५००/- रू. चा स्टॅम्पची किंमत ५५०/- रू. सांगितली. तेव्हा तक्रारदार हे त्यांना ५००/-रु चा स्टॅम्प तुम्ही ५५०/- रु ला देतात का? शासकिय नियमानुसार स्टॅम्पची किंमत ५००/-रु असतांना तुम्ही ५०/- रु जास्त का घेत आहेत ? असे विचारले असता स्टॅम्प वेंडर योगेश संघवी त्यांना म्हणाले की, ५५०/- रुपयेच लागतील, त्यात काही कमी होणार नाही. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, स्टॅम्प वेंडर योगेश संघवी हे स्टॅम्प पेपरच्या शासकिय नियमानुसार असलेल्या किंमतीपेक्षा अतिरिक्त पैशांची मागणी करीत आहेत. त्यावेळी त्यांच्याकडे आधारकार्ड नसल्यामुळे त्यांनी तक्रारदार यांना आधारकार्ड घेवुन या, तेव्हाच तुम्हाला स्टॅम्प भेटतील, असे सांगितले होते. त्यामुळे त्यादिवशी तक्रारदार हे तेथुन परत घरी निघुन गेले. स्टॅम्प वेंडर योगेश संघवी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही, परंतु त्यांनी जर त्यांना ५००/-रु च्या स्टॅम्पसाठी ५५०/-रु दिले नाहीत तर ते तक्रारदार यांना स्टॅम्प देणार नाहीत. तक्रारदार हे दि.१७/०३/२०२६ रोजी पाचोरा शहरातील जामनेर-पाचोरा रोडवरील प्रशांत झेरॉक्स येथील अधिकृत स्टॅम्प वेंडर योगेश संघवी यांच्याकडे तक्रारदार यांचे वैयक्तीक कामासाठी ५००/- रु दराचे १० स्टॅम्प घेण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी स्टॅम्प वेंडर योगेश संघवी यांनी ५००/- रुपये दराच्या १० स्टॅम्पसाठी ५०००/- रुपये पेक्षा शासकिय नियमांच्या व्यतिरिक्त अधिक ५००/- रु लाचेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दि.१७.०३.२०२६ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे |

| | | |
|---|---|---|
| | | तक्रार लिहुन दिली होती.<br>त्याप्रमाणे दि.१७.०३.२०२६ रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीत नमुद केलेप्रमाणे तक्रारदार यांचेकडे आलोसे क्र.१ यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ५००/-रु दाराच्या १० स्टॅम्पचे ५,०००/- रु होत असतांना ५,५००/-रुपयांची मागणी करून अधिकचे ५००/-रुपयांची मागणी केली.<br>आलोसे क्र.१ यांचे भाऊ आरोपी क्र.२ यांनी देखिल तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५००/-रु दाराच्या १० स्टॅम्पचे ५,०००/- रु होत असतांना ५,५००/-रुपयांची मागणी करून अधिकचे ५००/- रुपयांची मागणी करून सदरची लाच रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. |
| **सापळा कारवाई** | :- | **पर्यवेक्षण अधिकारी** :- श्री.योगेश ठाकूर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. जळगांव<br>**सापळा अधिकारी** :- श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव<br>**सापळा पथक** :- पो.अं.बाळु मराठे, पो.अं.भुषण पाटील, ला.प्र.वि.जळगांव<br>**तपास अधिकारी** :- श्रीमती स्मिता नवघरे पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| **मागदर्शन** | :- | **१) मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र,नाशिक.<br>३)मा.श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र,नाशिक. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

**संपर्क पत्ता** :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव.

संकेतस्थळ :– **acbmaharashtra.gov.in**

ई–मेल:– **spacbnashik@mahapolice.gov.in,** **dyspacbjalgaon@gmail.com**

ऑनलाईन तक्रार :– **acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :– **1064**

दुरध्वनी क्रमांक :– **0257-2235477**

व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांक :– **7588661064**